# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे
## श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७

### जाहीर सूचना

जा.क्र.-नियमन/मालमत्ता/नोंद/जा.सू./कमर्शियल भूखंड क्र.ई-५१/ ९० /२०२६-२७ दि. ८ /४/२०२६

श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड गुलटेकडी पुणे येथील गुळ भूसार विभागातील कमर्शियल भूखंड क्रमांक ई-५१ हा १) श्री. श्याम धरमचंद अग्रवाल २) श्री. श्रीकृष्ण धरमचंद अग्रवाल ३) श्री. धनराज धरमचंद अग्रवाल ४) श्री. कांतीलाल धरमचंद अग्रवाल या नावे नियमित शेतीमालाच्या पूरक व्यवसायासाठी भाडेपट्टयाने देणेत आला असून सदर भूखंडाचा नोंदणीकृत भाडेपट्टा १) श्री. श्याम धरमचंद अग्रवाल २) श्री. श्रीकृष्ण धरमचंद अग्रवाल ३) श्री. धनराज धरमचंद अग्रवाल ४) श्री. कांतीलाल धरमचंद अग्रवाल या नावे झाला आहे. तथापि १) श्री. श्रीकृष्णा धरमचंद अगरवाल २) श्री. धाजाराम धरमचंद अगरवाल ३) श्री. कांतीलाल धरमचंद गर्ग यांनी नोंदणीकृत (रजिस्टर्ड) हक्कसोडपत्रान्वये भूखंड क्रमांक ई-५१ वरील त्यांचा प्रत्येकी असणारा ¼ म्हणजेच २५ टक्के अविभक्त मालकी व लीजहोल्ड हक्क व हिस्सा श्री. श्याम धरमचंद अगरवाल यांचे लाभात सोडलेले आहेत. नोंदणीकृत भाडेपट्टयातील व नोंदणीकृत हक्कसोडपत्रातील नावातील बदल विचारात घेता नोंदणीकृत हक्कसोडपत्रात लिहून घेणार म्हणजेच श्री. श्याम धरमचंद अगरवाल यांचे आधार व पॅनप्रमाणे नाव श्याम धरमचंद अगरवाल व लीजडीडप्रमाणे नाव श्याम धरमचंद अग्रवाल असे आहे. तसेच लिहून देणार यांचे आधार व पॅनप्रमाणे नाव श्री. श्रीकृष्णा धरमचंद अगरवाल व लिज डीडप्रमाणे नाव श्री. श्रीकृष्ण धरमचंद अग्रवाल असे आहे. तसेच लिहून देणार श्री. धनराज धरमचंद अग्रवाल यांचे आधार व पॅनप्रमाणे नाव श्री. धाजाराम धरमचंद अगरवाल व लिजडीडप्रमाणे नाव श्री. धनराज धरमचंद्र अग्रवाल असे आहे. तसेच लिहून देणार श्री. कांतीलाल धरमचंद अग्रवाल यांचे आधार व पॅनप्रमाणे नाव श्री. कांतीलाल धरमचंद गर्ग व लिज डिडप्रमाणे नाव श्री. कांतीलाल धरमचंद अग्रवाल असे आहे असा नावामध्ये फरक आहे. सदर नावे प्रत्येकी त्यांचीच असून वेगवेगळया व्यक्तिंची नाहीत असे नमूद केले आहे. त्यामुळे १) श्री. श्रीकृष्णा धरमचंद अगरवाल २) श्री. धाजाराम धरमचंद अगरवाल ३) श्री. कांतीलाल धरमचंद गर्ग यांनी नोंदणीकृत (रजिस्टर्ड) हक्कसोडपत्रान्वये भूखंड क्रमांक ई-५१ वरील त्यांचा प्रत्येकी असणारा ¼ म्हणजेच २५ टक्के अविभक्त मालकी व लीजहोल्ड हक्क व हिस्सा श्री. श्याम धरमचंद अगरवाल यांचे लाभात सोडलेने सदर भूखंडावरील त्यांची नावे व मालकी हक्क कमी करून सदर भूखंडावर श्री. श्याम धरमचंद अगरवाल यांचे एकट्याचे नावाची नोंद होणेकामी संबंधितांनी या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

तरी, या नोंदीबाबत कोणाची काही तक्रार/हरकत असल्यास,दिनांक २४/०४/२०२६ पावेतो कृषि उत्पन्न बाजार समिती पुणे यांचे कार्यालयामध्ये लेखी स्वरुपात कळवावे. त्यानंतर कोणतीही तक्रार/हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सचिव　　　　सभापती

कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

प्रत -
विभाग प्रमुख
गुळ भूसार विभाग.